# National Seminar on Women Empowerment and Education







































# शिक्षणशास्त्र विभागाचा वार्षिक अहवाल

### विद्यापीठ वर्धापन दिन (Open Day ) - दि. २१ ते २२ ऑगस्ट २०१६

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, शिक्षणशास्त्र विभाग ये
दिवशी ५९ व्या विद्यापीठ वर्धापन दिन (Open day) निमित्त वेगवेगळया कार्यक्रमांचे आयोज
सांगणाऱ्या भित्तीपत्रकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. तसेच सर्वांसाठी **हेल्थ कॅंप** आयोजित
BP, ब्लडग्रुप पाहण्यात आले.

### सावित्रीबाई फुले जयंती, जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, नामविस्तार - दि. १६ जानेवारी २०१७

दि. १६ जानेवारी २०१७ रोजी सावित्रीबाई फुले जयंती, जिजाऊ जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, नामविस्तार दिन व भूगोल दिन यांचा संयुक्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात सरस्वती भूवन कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद येथील प्राध्यापिका डॉ. वृंदा देशपांडे यांनी सावित्रीबाई माहिती व महती सांगितली. दुसऱ्या पाहुण्या डॉ. अर्पिता सक्सेना एम.आय.टी. कॉलेज, औरंगाबाद यांनी विद्यापीठीय शिक्षणाबद्दल अपेक्षा व्यक्त केली. तसेच दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक गोष्टींची माहिती दिली.

तिसऱ्या पाहुण्या डॉ. नलिनी चोंडेकर यांनी भूगोल दिनाचे पर्यावरणीय महत्त्व स्पष्ट केले. त्यावरील व्हिडिओ क्लिप्स व रस सादर केली. आपल्या अध्यक्षीय समारोपात विभागप्रमुख डॉ. शोभना जोशी यांनी सावित्रीबाई, जिजाऊ, विवेकानंद यांच्या विचारातून काय घेतले पाहिजे याचे मार्गदर्शन केले. तसेच आपल्या विद्यापीठाला ज्या महामानवाचे नाव दिलेले आहे, त्यांच्या नावाचा महिमा जपण्याची आपली सर्वांची जबाबदारी आहे, त्यासाठी सर्वांनी त्यांची अभ्यासूवृत्ती जोपासली पाहिजे असे प्रतिपादन केले. शेवटी मकरसंक्रांतीचे भौगोलिक व सांस्कृतिक महत्त्व सांगून शेवटी सर्वांना तीळगुळाचे वाटप करून परस्पर गोडवा रूजवला.

### राष्ट्रीय कार्यशाळा -संशोधन साधनांची निर्मिती आणि प्रमाणीकरण (National woukshop on Preparation & standardization of Research Tool) - दि. २७ फेब्रुवारी २०१७

दिनांक २७ फेब्रुवारी २०१७ रोजी शिक्षणशास्त्र विभागामध्ये एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. Preperation & standardization of Research Tool म्हणजेच 'संशोधन साधनाची निर्मिती आणि प्रमाणीकरण' या विषयावर ही राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस तज्ञ मार्गदर्शक म्हणून आदरणीय डॉ. भरत रामानुज, विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट तसेच आदरणीय डॉ. दिप्ती कुंदल, सहयोगी प्राध्यापक, एम.एम.शाह अध्यापक महाविद्यालय, सुरेंद्रनगर, गुजरात हे उपस्थित होते.

**कार्यशाळेचे उद्‌घाटन -**

या कार्यशाळेस उद्‌घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील भूगोल विभागाचे विभाग प्रमुख आदरणीय डॉ. मदनलाल सुर्यवंशी सर हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत पगारे सर यांनी केले.

- **सकाळचे सत्र -** या कार्यशाळेदरम्यान तज्ज्ञांनी संशोधन साधन निर्मिती व प्रमाणीकरण या संदर्भात अत्यंत मोलाचे असे मार्गदर्शन केले. यादरम्यान संशोधन साधनांची ओळख आणि संशोधन साधनांचे प्रकार तसेच संशोधन साधनाची निर्मिती आणि प्रमाणीकरण यासंदर्भात सखोल असे मार्गदर्शन केले. त्यानंतर झालेल्या मुद्दयांवर चर्चा घडवून आणून विद्यार्थ्यांचे शंकासमाधान करण्यात आले.
- **दुपारचे सत्र -** दुपारच्या सत्रामध्ये थर्स्टन ची Construction of the attitude test यासदंर्भात सखोल असे मार्गदर्शन तज्ञांनी केले. त्यानंतर पुन्हा झालेल्या मुद्दयांवर चर्चा घडवून आणून विद्यार्थ्यांचे शंकासमाधान तज्ञांनी केले.

कार्यशाळेच्या समारोपादरम्यान कार्यशाळेस लाभलेल्या तज्ञांना शाल व स्मृतीचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले. तसेच कार्यशाळेच्या आयोजक तथा शिक्षणशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख आदरणीय डॉ. शोभना जोशी मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आदरणीय डॉ. उज्वला भडंगे मॅडम यांनी आभार व्यक्त केले. सूत्रसंचलन समरीन व अंजली गायकवाड यांनी केले.

## राष्ट्रीय चर्चासत्र : 'महिला सक्षमीकरण आणि शिक्षण' (National Seminar on Women Empowerment and Education) - दि. ११ मार्च २०१७

दिनांक ११ मार्च २०१७ या दिवशी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे महिला सक्षमीकरण आणि शिक्षण या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

- **पहिले सत्र -** या राष्ट्रीय चर्चासत्राला अध्यक्ष म्हणून आदणीय डॉ. एस.व्ही. जोशी उपस्थित होत्या. तसेच उद्घाटक तथा प्रमुख वक्ते म्हणून ताराबाई शिंदे स्त्री अध्यासन केंद्राच्या संचालक आदणीय डॉ. प्रतिभा अहिरे मॅडम या उपस्थित होत्या. तसेच या राष्ट्रीय चर्चासत्राला माजी अधिष्ठाता व माजी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गणेश शेटकर सर यांची विशेष उपस्थिती लाभली होती. या राष्ट्रीय चर्चासत्राच्या सुरुवातीला कार्यक्रमाची प्रस्तावना शिक्षणशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापिका आदणीय डॉ. उज्ज्वला भडंगे मॅडम यांनी केली. त्यानंतर या चर्चासत्राला विशेष उपस्थिती म्हणून लाभलेले आदणीय डॉ. गणेश शेटकर सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटक तसेच प्रमुख वक्ते आदरणीय डॉ. प्रतिभा आहिरे मॅडम यांनी सर्व उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर पहिल्या सत्राच्या शेवटी शिक्षणशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक आदरणीय डॉ. सुहास पाठक सर यांनी आभार प्रदर्शन करुन सर्वांचे आभार व्यक्त केले.
- **दुसरे सत्र -** दुसऱ्या सत्रासाठी वक्त्या म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माजी अधिष्ठाता तसेच विवेकवर्धिनी अध्यापिका महाविद्यालय, नांदेड येथील प्राचार्या आदरणीय डॉ. उज्वला सदावर्ते मॅडम या उपस्थित होत्या. दुसऱ्या सत्राच्या दरम्यान त्यांनी अत्यंत मोलाचे विचार उपस्थितांसमोर मांडून महत्त्वपूर्ण असे मार्गदर्शन केले.
- **तिसरे सत्र -** या राष्ट्रीय चर्चासत्राच्या तिसऱ्या सत्रासाठी वक्त्या म्हणून एम.पी.लॉ. कॉलेज, औरंगाबाद येथे सहाय्यक प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या आदरणीय डॉ. अपर्णा कोतापल्ले मॅडम या उपस्थित होत्या. आदरणीय कोतापल्ले मॅडम यांनी महिलांसाठी असलेले विविध कायदे तसेच महिलांसंदर्भात घडणाऱ्या विविध गुन्हयांचा संदर्भ देवून अत्यंत मोलाचे असे मार्गदर्शन केले. त्यानंतर तिसऱ्या सत्रादरम्यान एकंदर चर्चासत्रावर सहभागींनी आपले अभिप्राय व मत व्यक्त केलेत.

राष्ट्रीय चर्चासत्राच्या अध्यक्षा तथा विभागाच्या विभाग प्रमुख आदरणीय डॉ. शोभना जोशी यांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा वेगळ्या दृष्टिकोनातून सर्वांसमोर मांडला व सक्षमी करणाबाबत आपले मत व्यक्त करुन अध्यक्षीय समारोप केला. एकंदरीत चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी आदरणीय डॉ. उज्वला भडंगे मॅडम यांनी सर्वांचे आभार व्यक्त केलेत. याप्रकारे हे राष्ट्रीय चर्चासत्र पार पडले.

## क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम - दि. ४ मार्च २०१७

दि. ४ मार्च २०१७ रोजी विभागांतर्गत क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या. यात एम.एड., एम.फिल. व पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यात १०० मीटर धावणे, लांबउडी, भालाफेक, गोळाफेक व थाळीफेक या स्पर्धा घेण्यात आल्या.

त्यानंतर दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण झाले यात गायन, नाटिका, भूमिकाभिनय सादर करण्यात आले. सर्वांनी आपापले कलागुण सादर केले.

## निरोप समारंभ - एम.एड. द्वितीय वर्ष (२०१५-१७) दि. ७ एप्रिल २०१७

नवोगतांचे स्वागत आणि जाणाऱ्यांना भावपूर्ण निरोप याप्रमाणे दिनांक ७ एप्रिल २०१७ या दिवशी शिक्षणशास्त्र विभागात दरवर्षाप्रमाणे याही वर्षी निरोपसमारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शिक्षणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख आदरणीय डॉ. शोभना जोशी उपस्थित होत्या. तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख आदणीय डॉ. स्मिता अवचार मॅडम या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व प्रतिमापूजन करुन करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत कार्यक्रमाच्या अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर एम.फिल. द्वितीय वर्षाचे प्रशिक्षणार्थी रजनीकांत गायकवाड यांनी केले. त्यानंतर एम.एड. च्या प्रशिक्षणार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केलेत. त्यानंतर गुणगौरव सोहळा घेण्यात आला. त्यामध्ये वर्षभर विद्यार्थ्यांनी सहभागातून केलेल्या प्रावीण्याबद्दल त्यांना प्रशस्तीपत्रक देवून सन्मानित करण्यात आले. यामध्ये एम.फिल. व एम.एड. च्या प्रशिक्षणार्थींना विविध शैक्षणिक पुरस्कार तसेच क्रिडा स्पर्धेदरम्यान विजेते ठरलेल्यांना प्राप्त झालेले पुरस्कारांचा समावेश होता.

त्यांनतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या आदणीय डॉ. स्मिता अवचार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा आदरणीय डॉ. शोभना जोशी मॅडम यांनी अध्यक्षीय समारोप केला. शेवटी एम.फिल. द्वितीय वर्षाचे प्रशिक्षणार्थी रजनीकांत गायकवाड यांनी आभार व्यक्त केले. सूत्रसंचलन अंजली गायकवाड व जयश्री शिंदे यांनी केले.